# एम्कोने दिला ठामपाच्या विद्यार्थ्यांना परिवर्तनाचा आत्मविश्वास

ठाणे, दि. २२ (वार्ताहर) - व्यक्तीमत्व विकासाने आपल्यातील आत्मविश्वास वाढतो. आपली इतरांवर एक वेगळीच छाप पडते. इतर ठिकाणी कसं वागावं याचं ज्ञान मिळतं. हेच परिवर्तनाचे ज्ञान एम्को फाऊंडेशनने ठाणे महापालिकेच्या विद्यार्थ्यांना दिले.

ठामपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातील परिवर्तन हे एम्को फाऊंडेशनच्या प्रयत्नातून साध्य झाले आहे. व्यक्तीमत्व विकासाचे महत्व लक्षात घेऊन एम्को फाऊंडेशनने परिवर्तन प्रकल्पाची सुरुवात २००८ मध्ये केली.

परिवर्तनचा हा सहावा वार्षिक कार्यक्रम गडकरी रंगायतन, ठाणे मध्ये यशस्वीपणे झाला. ठाणे महापालिका शाळेतील सर्व १३ शाळांच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने यात सहभाग घेतला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रोथ सेंटरच्या इंडिया प्रा.लि. च्या मॅनेजिंग डायरेक्टर स्वाती साळुंखे तसेच एम्को फाऊंडेशन ट्रस्टी मिनाक्षी जैन मॅडम, मॅनेजिंग ट्रस्टी एम्को फाऊंडेशन एस. रामस्वामी उपस्थित होते.

स्वाती साळुंखे यांनी अतिशय सोप्या शब्दात मार्गदर्शन केले. त्यांच्या आयुष्यात आलेले अनुभव विद्यार्थ्यांसोबत चर्चित केले. तसेच त्यांनी सांगितले की नेहमी लक्ष्यावर एकाग्रता करुन मेहनत करणे ही यशाची गुरुकिल्ली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाणे महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, टीएमसी स्टाफ, स्वयंसेवक, ट्रेनर आणि एम्कोचे कर्मचारी अधिकारी तसेच इतर आमंत्रित पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये पारितोषिक वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांची मनोगताने हे कार्यक्रम झाले.

जीवन प्रकल्पाअंतर्गत एम्को कंपनीच्या व ेगवेगळ्या ळेचतेन्सिमध्ये दर वर्षी रक्तदान शिबीर आयोजित करतो. ठाणे महापालिकेच्या एका शाळेत विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा चांगला फायदा व्हावा या उद्देशाने एम्कोने ईक्रासेस सुरु केला. विद्यार्थ्यांसाठी राबवित आहोत आणि शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी याचा चांगला फायदा करुन घेत आहेत.